दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ मंगळवार, १९ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ३२ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# राज्यात पुन्हा निवडणुकीची रणधुमाळी

## विधान परिषदेच्या १६ जागांसाठी मतदान

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १६ जागांसाठी निवडणुकांची घोषणा निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.१८) केली. या सर्व जागांसाठी १८ जून २०२६ रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी नागपूर मतदारसंघातील पोटनिवडणूकही होणार आहे. निवडणूक जाहीर होताच संबंधित भागांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

**'या' १६ मतदारसंघांमध्ये होणार मतदान**

सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, उस्मानाबाद-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, धाराशिव-जालना या मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

या मतदारसंघांचे प्रतिनिधित्व यापूर्वी प्रशांत परिचारक, चंदुभाई पटेल, अंबादास दानवे यांसारख्या दिग्गज नेत्यांनी केले होते.

**नागपूरमध्येही पोटनिवडणुकीची घोषणा**

नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद जागेसाठी पोटनिवडणुकीचीही घोषणा करण्यात आली आहे. भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे हे नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेसाठी



निवडून गेल्यानंतर त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर ही जागा रिक्त होती. मात्र, आवश्यक निकष पूर्ण न झाल्यामुळे ही पोटनिवडणूकही रखडली होती. त्यानंतर आता नागपूरमध्येही १८ जूनलाच मतदान होणार आहे.

**रखडलेल्या निवडणुकांना अखेर हिरवा कंदील**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १६ सदस्यांचा कार्यकाळ २०२२ ते २०२५ या कालावधीत संपला होता. मात्र अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत, प्रशासकीय अडचणी आणि मतदार याद्यांशी संबंधित निकष पूर्ण न झाल्यामुळे निवडणुका वेळेत घेता आल्या नव्हत्या.

आयोगाच्या नियमांनुसार, एखाद्या मतदारसंघात किमान ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे आणि किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणे आवश्यक असते. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आता हे सर्व निकष पूर्ण झाल्याची माहिती आयोगाला दिल्यानंतर निवडणुकीची घोषणा करण्यात आली.

### निवडणुकीचे वेळापत्रक

**२५ मे २०२६ - अधिकृत अधिसूचना जारी**
**१ जून २०२६ - नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख**
**२ जून २०२६ - अर्जांची छाननी**
**४ जून २०२६ - उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख**
**१८ जून २०२६ - मतदान (सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत)**
**२२ जून २०२६ - मतमोजणी आणि निकाल**

## जमिनीच्या वादातून भावाने सुपारी देऊन भावाची हत्या केली; गणेशपुरी पोलिसांनी खुनाच्या प्रकरणाचा छडा लावला

महाराष्ट्र जीत

**भिवंडी, (सुनील झळके) :** ठाणे ग्रामीण पोलिसांनी गणेशपुरी हत्याकांडाचा पर्दाफाश करून चार आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक खुलासा हा आहे की, मृताच्या स्वातःचे भावाने त्याची हत्या करण्यासाठी १० लाख रुपयांची सुपारी दिली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी, भिवंडी तालुक्यातील शेडगाव येथील रहिवासी परेश पाटील (४०) हे आपल्या मोटरसायकलवरून वसईला कामावर जात होते. वाशिंद-अंबाडी रस्त्यावरील शेडगाव फाट्याजवळ अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. डोक्यावर जबर प्रहार झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. मृताचा भाऊ, नरेश पाटील यांनी गणेशपुरी पोलीस ठाण्यात हत्येची तक्रार दाखल केली. प्रकरणाचे



गांभीर्य लक्षात घेऊन, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालते यांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशीचे आदेश दिले.

गणेशपुरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव आणि स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गिट्टे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, रोहन शेलार, भाऊसाहेब गायकवाड, शरद सुराळकर, उमेश खिरद, मयूर शेवाळे आणि निरंजन पाटील यांचा समावेश असलेल्या पथकाने तपास सुरू केला.

गणेशपुरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुमारे २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला.

पोलिसांनी मृताचे भाऊ, राकेश पाटील (३७), प्रेमजीत घरात (३८) आणि दक्षत भोईर (२४) यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. त्यांनी हत्येची कबुली दिली. तपासात असे उघड झाले की, मृताचा भाऊ, फिर्यादी नरेश पाटील हा या संपूर्ण कटाचा सूत्रधार होता. जमीन आणि घर भावाच्या नावावर असल्याने संतप्त झालेल्या नरेशने, हत्येसाठी पालघरच्या केळवा भागातील गुन्हेगारांना १० लाख रुपये सुपारी दिली होती. पोलिसांनी चारही आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू केला आहे.

मयत परेश आणि आरोपी नरेश हे सख्ख्या भाऊ होते. थोरला भाऊ परेशने त्यांची सामायिक शेतजमीन आणि घर स्वतःच्या नावावर हस्तांतरित केले होते.

यामुळे संतापलेल्या धाकट्या भाऊ नरेशने, आपल्याच भावाची हत्या करण्यासाठी पालघरच्या केळवा भागातील गुन्हेगारांना १० लाख रुपयांचे सुपारी दिली असल्याचे उघडकीस आले.

## वैश्विक ओळखपत्र आयडी कार्ड सादर करण्यास मुदतवाढ

### मनसे मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मागणीला यश

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** महाराष्ट्रातील दिव्यांगांना 31 मार्च 2026 पूर्वी वैश्विक ओळखपत्र युडी आयडी कार्ड सादर करण्याबाबत 27 मार्च 2026 रोजी सामाजिक न्याय विभागाने शासन निर्णय पारित करुन कायमस्वरूपी दिव्यांग प्रमाणपत्र वैश्विक ओळखपत्र ज्या लाभार्थ्यांकडे नाही अशा सर्व लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचा लाभ बंद करण्यात येणार होता. याबाबत सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री यांच्याकडे जिल्हाधिकारी मार्फत मनसेचे मा. जिल्हाध्यक्ष



मनिष डांगे यांनी पत्रव्यवहार करून वैश्विक ओळखपत्र काढण्याबाबत शासनाने मुदत वाढ देण्याची मागणी निवेदन देऊन लावुन धरली होती. या संदर्भात 15 मे 2026 रोजी दिव्यांग सक्षमीकरण विभागाने वैश्विक ओळखपत्र युडी आयडी कार्ड काढण्याकरता, सक्षम प्राधिकऱ्याने दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र, एसएडीएम प्रणालीमध्ये देण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राचे युडी आयडी कार्ड वैष्णिक ओळखपत्र काढण्याकरता 30 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदत वाढ दिल्यामुळे संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळणार असल्यामुळे महाराष्ट्रातील दिव्यांगांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. परंतु शासन निर्णय दुरुस्तीमध्ये तात्पुरत्या दिव्यांगांना सुद्धा त्यांची मुदत संपेपर्यंत संजय गांधी योजनेचा लाभ देण्यात यावा अशी माघणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्यावतीने करण्यात आली आहे.

## ओबीसींची जातिनिहाय जनगणना करा, अन्यथा दिल्ली जाम करू – सचिन राजुरकर

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर ठाणे:-** राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे जातिनिहाय जनगणना करण्यासाठी महाराष्ट्रात जनगणना जागृती अभियान 15 मे पासून कोकणातील शहापूर, कल्याण ,ठाणे, वाडा, पालघर अशा विविध तालुक्यात ओबीसी जातनिहाय जनगणना झाली पाहिजे. याकरिता जनजागृती अभियान सुरू होवून यशस्वीपणे संपन्न झाला.16 मे रोजी ठाणे येथे आयोजित सभेत ओबीसींची जातिनिहाय जनगणना करा, अन्यथा दिल्ली जाम करू असे सभे दरम्यान राजुरकर बोलत होते.

ठाणे येथे आयोजित सभेत सचिन राजुरकर (महासचिव राष्ट्रीय ओबीसी महासंघ) यांनी केंद्र सरकारला इशारा देत म्हटले की, ओबीसी समाजाची जातिनिहाय जनगणना तात्काळ करण्यात यावी. देशातील ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थिती समोर आणण्यासाठी जातिनिहाय जनगणना अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, "जोपर्यंत ओबीसी समाजाची अधिकृत आकडेवारी समोर येत नाही, तोपर्यंत समाजाला न्याय मिळणार नाही. सरकारने जर आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने हिवाळी अधिवेशन दरम्यान दिल्लीमध्ये तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि 'दिल्ली जाम' करण्याचा इशारा देण्यात आला राजुरकर यांनी केंद्र सरकारला इशारा देत म्हटले की, ओबीसी



समाजाची जातिनिहाय जनगणना तात्काळ करण्यात यावी. देशातील ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थिती समोर आणण्यासाठी जातिनिहाय जनगणना अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने 30 एप्रिल 2025 ला केंद्रीय मंत्रीमंडळ बैठकीत घोषणा केली होती परंतु 22 जानेवारी 2026 जनगणना आयुक्तांनी भारत सरकार पत्रात घर गणना मध्ये 33 प्रश्नाची सूचित 12 व्या क्रमांकावर अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती कुटुंब प्रमुखाचा उल्लेख असून बाकी साठी अन्य केल्याने ओबीसी समाजा मध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, जनगणना आयुक्ताने राजपत्र काढून समाजाचा संभ्रम दूर करावा. सभेच्या प्रत्येक ठिकाणी 14 मे 2026 रोजी निघालेल्या जीआर वर निषेध व्यक्त करून ठराव घेण्यात आला. स्पर्धा परीक्षांमध्ये एसटी, एससी व ओबीसीच्या विद्यार्थ्यांना आता ओपन कॅटेगिरीतून प्रवेश मिळणार नाही. यासाठी निषेध व्यक्त करून पुढे मोर्चा, आंदोलने केली जाणार असे सूतोवाच राजूरकर यांनी केले. 17 मे रोजी पालघर जिल्हयाचा दौरा सुद्धा यशस्वीपणे पार पडला.

या अभियान दरम्यान राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश भांगरथ, कोकण विभाग अध्यक्ष एकनाथ तारमळे,अरुण मडके ठाणे जिल्हा अध्यक्ष अशोक विशे, कांचन विशे, सुनिल पाटील, बुलढाणा जिल्हाध्यक्ष सुरज बोलेकार, सुरेश कापरे, भानुदास भोईर, किशोर कुडव, रमेश वनारसे, दशरथ हरड, किसन बोंद्रे, अनिल निचिते, भगवान ठाकूर, युवराज ठाकरे, हरिभाऊ पाटील, नरेश आकरे, गोविंद पाटील, शिवाजी पाटील, निलेश गंधे, गो. धा. पाटील सर, राहुल ठाकरे, रमेश मुकादम, परशुराम पितांबरे, जनार्दन पाटील, अरूण पाटील, रविंद्र घोडविंदे, शोभाताई म्हात्रे, काजल घोलप, प्रकाश पवार, मिलिंद मडके, दिलीप पवार, वसंत भेरे, कुमार वेखंडे, शिवाजी बेलवले, मधुकर शिंदे, रमेश तारमळे व इतर ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. वय, शैक्षणिक पात्रता अनुभव परीक्षेत बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवाराची नियुक्ती राखीव पदावरच होणार, अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही असा निर्णय दिनांक 14 मे 2026 मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला या निर्णयाचा निषेधाचा ठराव करण्यात आला

## जेलरोड येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जनसंवाद मेळाव्याचे आयोजन :- आयोजक महानगरप्रमुख दिनेश दादा जाधव

महाराष्ट्र जीत

**जेलरोड, प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात दादा आंबेडकर यांचा उपस्थितीमध्ये नाशिक मध्ये भव्य जनसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता.

नाशिक शहरातील विविध प्रश्नांवर त्यांनी नागरिकांशी संवाद साधून मोदी सरकारला निशाणा केले.

शहरात घडलेल्या तीन मोठ्या प्रकारांमुळे नाशिक शहराला गालबोट लागले आहे. खरात प्रकरणात मोठमोठे नेत्यांचा सहभाग, टीसीएस प्रकरणात हिंदू मुस्लिम वाद उभा करून भांडणे लावली जात आहे. तर नीट पेपर फूटीच्या प्रकरणी सरकारचा डाव, शिक्षण व्यवस्था विकायला काढली आहे की काय..? अशी टीका यावेळी सुजात आंबेडकर यांनी केली.

नाशिकरोड जेलरोड भागातील राजेश्वरी चौकात वंचित बहुजन आघाडीचे नाशिक महानगर अध्यक्ष आणि दयावान फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिनेश जाधव आयोजित केलेल्या जनसंवाद मेळाव्यात ते



बोलत होते.

या मेळाव्यामुळे नाशिक मधील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मधुर भीम गीतांनी आणि जय भीमच्या घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

दिनेश जाधव यांच्या प्रवेशाने वंचित बहुजन आघाडीची नाशिक शहरात ताकत वाढली असून नवयुवकांना चांगला मार्गदर्शक, समाज रक्षक, युवा नेता मिळाल्याचा आनंद होत असल्याची भावना युवा नेते सुजात आंबेडकर यांनी बोलताना व्यक्त केली.

यावेळी नाशिक जिल्हा निरीक्षक दिशा शेख जिल्हाध्यक्ष चेतन गांगुर्डे वंचित महिला जिल्हा अध्यक्ष उर्मिलाताई गायकवाड यांनी उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल दिनेश जाधव व मित्र परिवाराचे कौतुक केले.

या भव्य संवाद मेळाव्या दरम्यान MJ फाउंडेशनच्या मृणाली मतेश जेडगुले, सामनगाव येथील शुभम जगताप, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ओबीसी सेल नाशिकरोड अध्यक्ष नामदेव गोपाळ, हेमंत प्रधान, अमोल सोळस, अजित पवार यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला.

या जनसंवाद मेळाव्याचे आयोजन नाशिक महानगर अध्यक्ष दिनेश जाधव, जिल्हा उपाध्यक्ष लीना खरे, शहर उपाध्यक्ष उषा पगारे, मोनिका जाधव, बाळा जाधव, महासचिव हर्षल जाधव, उपाध्यक्ष विकी मकासरे, सचिव भूषण बच्छवाल, दीपक पगारे, ओम पिशवे, शरद भोगे, वैभव शेरकर, मिलिंद उबाळे, सागर रिपोटे,उदय गांगुर्डे, सुरज शेजवळ, पवन वारूळकर, किरण गायकवाड,सिद्धांत जाधव यांनी केले. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे उपजिल्हाध्यक्ष नाना पवार, महासचिव विश्वनाथ भालेराव, पंडित नेटावटे, जिल्हा उपाध्यक्ष भीमचंद्र शेठ चंद्र मोरे दिंडोरी तालुका अध्यक्ष बाळासाहेब शेजवळ, ओझर तालुका अध्यक्ष सचिन हिरे, गायक सोमनाथ गायकवाड जिल्हासचिव राजेंद्र गवारे, जिल्हा संघटक दीपक भंडारी, साहेबराव शिंदे, प्रकाश खडसे, अशोक आगळेकर

प्रास्ताविक वंचित बहुजन आघाडी प्रसिद्धी प्रमुख गोकुळ लोखंडे यांनी केले, तर सूत्रसंचालन जिल्हा महासचिव विश्वनाथ भालेराव यांनी केले.

## संपादकीय

### अनिर्णित आणि निर्णायक

अमेरिका व चीन या महासत्तांच्या राष्ट्रप्रमुखांची थेट भेट उभयपक्षी व्यापार वा जागतिक शांततेसाठी उपयुक्त ठरण्यापेक्षा ‘तैवान चीनचाच’ या इशाऱ्यामुळे लक्षणीय...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यातील बहुचर्चित, बहुप्रतीक्षित बीजिंग शिखर परिषद कोणत्याही ठोस निर्णयाविनाच पार पडली. तैवान आणि विशेषत: तेहरानच्या मुद्द्यावर मतभेद वा सहमती घडून येईल याविषयी आशावाद आळवणाऱ्यांची यामुळे काहीशी निराशा होणे अपेक्षितच. खुद्द जिनपिंग आणि ट्रम्प यांच्या अजेंड्यावर वरील मुद्दे खरोखरच होते का हे कळायला मार्ग नाही. जगात सध्या या दोनच महासत्ता. दोन महासत्ताधीशांनी एकत्र येऊन, बसून जागतिक शांततेच्या किंवा तत्सम कळीच्या मुद्द्यावर काही तोडगा काढल्याची उदाहरणे इतिहासात तशीही फार आढळत नाहीत. त्यामुळे विशेषत: इराण युद्धाच्या बाबतीत तसा तो निघेल, ही अपेक्षा बाळगणे काहीसे अज्ञानमूलक. शिवाय संघर्षनिवारण हा जिनपिंग यांचा पिंड नाही आणि ट्रम्प यांचा तितका वकूब नाही. ट्रम्प यांनी चीनच्या दौऱ्यात परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो, संरक्षणमंत्री पीट हेगसेथ अशा नित्याच्या लवाजम्यासह टेस्ला कंपनीचे इलॉन मस्क, ॲपलचे टिम कुक, एनव्हिडियाचे जेन्सन हुआंग अशा उद्योगाधिपतींचाही समावेश केला होता. असा एकूण जामानिमा पाहता, व्यापार आणि उद्योग क्षेत्रात तरी काही भरीव घोषणा होतील असा भास निर्माण केला गेला. दोन दिवसांच्या भेटीतील सर्व चर्चा बंद दरवाजाआड झाल्या, त्यांत नेमके काय चर्चिले गेले याचा तपशील फारसा बाहेर आलाच नाही. बोइंग विमाने, गोमांस आणि सोयाबीन या अमेरिकी उत्पादनांसाठी चीनची अधिक व्यापक बाजारपेठ खुली व्हावी असा ट्रम्प यांचा प्रयत्न होता. त्यांनी दौऱ्याहून मायदेशी परतताना त्यांच्या शैलीत अनेक उथळ दावे केले. त्या दाव्यांना आज कोणीही गांभीर्याने घेत नाही हे वास्तव आहे. चीनकडून त्या दाव्यांना दुजोरा मिळालेला नाही. तो कदाचित येत्या काही दिवसांत मिळेल वा न मिळेल. तरीही येत्या काही दिवसांत ट्रम्पही बीजिंग बैठकीविषयी आणखी काही विधाने करतील. त्यांच्या बाबतीत हे वारंवार घडलेले आहेच. पण या संपूर्ण भेटीत ज्याच्याविषयी शंकेला वा तर्काला अजिबात जागा उरत नाही अशी घडलेली एकमेव बाब म्हणजे, क्षी जिनपिंग यांनी तैवानच्या मुद्द्यावरून ट्रम्प आणि अमेरिकेला दिलेला इशारा.

दोन दिवसांच्या भेटीच्या पहिल्या दिवशी, पहिल्या बैठकीच्या दरम्यान जिनपिंग यांनी ट्रम्प यांना तैवानच्या बाबतीत दिलेला इशारा नि:संदिग्ध होता. तैवानचा मुद्दा चुकीच्या पद्धतीने हाताळला गेल्यास चीन आणि अमेरिका यांच्यात संघर्ष उडू शकतो, असा त्या इशाऱ्याचा मथितार्थ. येत्या काही काळात या दोन महासत्तांमध्ये तिसरे मोठे युद्ध झालेच, तर त्याचा केंद्रबिंदू तैवान असेल याविषयी कोणाचेही दुमत नाही. तसे ते होऊ नये याची जबाबदारी चीनने अमेरिकेच्या गळयात मारलेली दिसते. जिनपिंग यांनी हा मुद्दा रेटताना दिलेला संदर्भ अधिक सूचक होता. त्यांनी ‘थुसिडिडीझ सापळया’चा उल्लेख केला. या सापळयात सापडू नये याची काळजी दोन्ही देशांनी घेतली पाहिजे, असे जिनपिंग सुचवतात. थुसिडिडीझ हा ग्रीक इतिहास लेखक. इसवीसनपूर्व अंदाजे ४६०-४०० या काळात होऊन गेला. तत्कालीन प्रस्थापित सत्ता स्पार्टाला अथेन्स या उदयोन्मुख सत्तेने आव्हान दिले. यांतून दोहोंमध्ये घनघोर युद्ध झाले. अशा परिस्थितीत सहसा संघर्षाची ठिणगी उडतेच, असा सिद्धान्त थुसिडिडीझने मांडला, ज्यास थुसिडिडीझ ट्रॅप असे संबोधले जाते. जिनपिंग यांचा संदेश स्वच्छ होता. चीन ही उदयोन्मुख सत्ता आहे. अमेरिका ही प्रस्थापित सत्ता आहे. चीनचा उदय अमेरिकेने स्वीकारावा अन्यथा संघर्ष अटळ आहे. तो टाळण्याची जबाबदारी अमेरिकेची आहे. अलीकडच्या इतिहासात अमेरिकेला इतक्या नेमक्या आणि स्वच्छ शब्दांत एखाद्या मोठ्या सत्तेने सुनावल्याचे दुसरे उदाहरण सापडत नाही. बदलते वास्तव अमेरिकेने मान्य करावे.

# छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद ) भिमटेकडी येथील विश्वशांती बुध्द विहारात भिमजयंती ते बुध्दजयंती बुद्धिस्ट फेस्टिवल 2026 उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**छत्रपती संभाजीनगर :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या संभाजीनगर (औरंगाबाद) येथील विश्वशांती बुद्ध विहार,भीम टेकडी,जटवाडा सुभाष नगर येथे 2026 बुद्धिस्ट फेस्टिवल अंतर्गत भिमजयंती ते बुध्दजयंती च्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमालेचा व बुध्दभिम गीतांचा कार्यक्रम कार्यक्रम 17 मे ला संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष पु.भदन्त खेमोधम्मोजी महास्थवीर, उद्धाटक मुंबईचे सेवानिवृत्त जिल्हाधिकारी शिस्तप्रिय प्रशासक रोकठोक व्यक्तीमत्व उत्तमरावजी खोब्रागडे, विशेष अतिथी जेष्ठ साहीत्तीक प्रा.डॉ.ऋषिकेशजी कांबळे, विशेष उपस्थिती श्रद्धा हॉस्पिटल औरंगाबादचे डॉ. मानवजी पगारे, जेष्ठसमाजसेवीका अनिताताई हिवाळे, जेष्ठ पत्रकार बुलडाणा बाबासाहेब जाधव, नगरसेवीका विजयश्री जाधव यांचे पती आशिष जाधव होते.

सर्व प्रथम महाकरूणीक भगवान गौतम बुद्धांच्या व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहूणे व आयोजीका पु.प्रा.भिक्खुणी माताजी धम्मदर्शना महाथेरी व भंते संघपाल यांनी दिपधूप पुष्पाने पुजन करून बुध्द वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा माताजी धम्मदर्शना महाथेरी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून माताजी व भंते संघपाल यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष खेमोधम्मोजी महास्थवीर यांना चिवरदान व प्रमुख पाहुण्यांचा पुष्प गुच्छ शाल देऊन स्वागत केले.

या कार्यक्रमाचे प्रस्तावित आयोजिका भारतीय विनय अलंकार धम्मज्ञान प्रशिक्षण केंद्र




भिमटेकडीच्या संस्थापीका माताजी धम्मदर्शना महाथेरी यांनी येथील कार्याचा संपूर्ण आढावा सांगितला.

वयाच्या तेराव्या वर्षी चिवर परिधान करून बौध्द धर्माचा स्वीकार केला व त्यांच्या 32 वर्षांचा आपल्या संघर्षमय जीवनप्रवासाचा आढावा घेतला. जिवन संघर्ष कसा केला या संघर्षातून भिमटेकडीच्या वसाड वनात हिवराच्या झाडाखाली राहून एमए,बीएड,एमएड,एमफिल,पाली शिक्षण घेतले वसाड वनाचे नंदनवन केले या नंदनवनात बुध्दविहार, पासष्ट फुट बुध्दाची महानिर्वाण मुद्रा, शंभर बेडचे हाऊस्पिटल, पाली स्कूल, इंग्लिश स्कुल, मुलांचे वस्तीगृह व आता साठ आयएएस-आयपीएस प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे कार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.समाजहितासाठी सुरू असलेल्या या प्रकल्पांना समाजातील धम्मदाते आणि दानसूर व्यक्तींनी तन,मन आणि धनाने सहकार्य करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

भिमजयंती ते बुद्धजयंती संयुक्त विद्यमानाने बुध्दिस्ट फेस्टिवल 2026 व्दारे भिमजयंती व बुध्दजयंती कशी साजरी करावयाची त्याचा समाजावर होणारा परिणाम या बाबत मान्यवरांचे व्याख्यान 17 मे रोजी एक महीण्याच्या

या शिबिरात ४० श्रामनेर-श्रामनेरी यांना बौद्ध धम्म विषयक प्रशिक्षण देण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमात व्याख्यानमालेचे आयोजन व भिमबुध्द गिताचा प्रबोधनाचा कार्यक्रम करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भदंत खेमधम्मो हे होते. आपल्या उद्घाटनीय भाषणात माजी आयएएस अधिकारी मुंबईचे जिल्हाधिकारी उत्तमरावजी खोब्रागडे यांनी बौद्ध धम्मातील समतावादी, विज्ञानवादी तत्त्वांवर,जून्यारूढीपरेंपरेवर प्रकाश टाकला. व्याख्याते डॉ.मानव पगारे यांनी बौद्ध धम्माशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले.ज्येष्ठ पत्रकार बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख बाबासाहेब जाधव यांनी दान पारमितेचे महत्त्व सांगितले, तसेच तथागताचे तत्वज्ञान व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ज्या ज्या कुटूंबांनी, समाजांनी आत्मसात केले त्या त्या समाजाची व कुटुंबाची प्रगती झाल्याशिवाय राहत नाही.

शिक्षण हे वाघीनीचे दुध्द आहे ते पीले की, मनुष्य गुरगुरल्या शिवाय राहत नाही म्हणून प्रत्येक मनुष्यांनी हे शिक्षणाच दुध्द पुल्याच पाहीजे त्यातच मानव जातीची प्रगती आहे असे विचार मांडले. तर समाजसेविका अनिताताई हिवाळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीवर चालण्याचा सल्ला दिला. आंबेडकरी तत्त्ववेत्ते जेष्ठ साहीत्तीक डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. बुध्दाची करूणा आणि डॉ. बाबासाहेबांचा आंबेडकर स्वाभिमान अंगीकारल्यास जिवन यशस्वी होते, असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात भदंत खेमधम्मो यांनी बौद्ध धम्मातील मनोविज्ञानावर प्रकाश टाकला.

उपस्थित मान्यवरांनी आयोजिका माताजी धम्मदर्शना महाथेरी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माता धम्मदर्शना यांनी तर आभार प्रदर्शन सुमित दांडगे यांनी केले. या प्रसंगी बुलढाणा जिल्ह्यातील आदरणीय भंते संघपाल यांची विशेष उपस्थिती होती.या प्रसंगी श्रामनेर शिबिरातील सर्व शिबिरार्थींना सन्मानपूर्वक प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.धम्म प्रचारचे संपादक प्रल्हाद गवळी यांचा प्रशस्ती पत्र देऊन सत्कार केला. या कार्यक्रमासाठी शिक्षण विस्तार अधिकारी विमलताई जाधव,निळे प्रतिकचे संपादक रतनकुमार साळवे,आदर्श शिक्षक उज्वलकुमार म्हस्के, समाजसेवक पंडीतराव बोर्डे, धम्मउपासक वैभव सिरसाठ यांच्यासह बौद्ध उपासक-उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधाकर उमाळे,अनिकेत ओव्हाळ,नितेश उमाळे,जोगेंद्र तायडे, भाग्यशाली तायडे, शितल सिरसाठ यांनी परिश्रम घेतले. शरणय गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सिन्नर येथे भूमि अभिलेख कार्यालयासमोर महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण

महाराष्ट्र जीत

**सिन्नर (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली वंचित बहुजन आघाडीचे सिन्नर तालुका उपाध्यक्ष प्रविण रणशेवरे व त्यांच्या कुटुंबीयांनी आमरण उपोषण सुरू केले असून जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांनी पत्रकारांना प्रतिक्रिया देताना सांगितले.तसेच मौजे गोंदे ता.सिन्नर येथील मालमत्तेवरील नाव बदलले आहे ते दुरुस्त करुन मालमत्तेवर रणशेवरे कुटुंबीयांचे नाव लावून तशी सनद देण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात..याप्रसंगी भिमटोला




सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे, राष्ट्रवादीचे सिन्नर तालुका अध्यक्ष संदीपभाऊ भालेराव, वंचित बहुजन आघाडीचे सिन्नर तालुका संपर्कप्रमुख संजय जगताप, आरटीआय पर्यावरण विभाग महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा मा. सरपंच उत्तम मोकळ, वंचितचे सिन्नर युवक तालुकाध्यक्ष तुषार आण्णा जाधव, वंचितचे सिन्नर तालुका उपाध्यक्ष प्रविण रणशेवरे, वंचितचे सिन्नर तालुका महासचिव अविनाश जगताप, सामाजिक कार्यकर्ते तथा मा. सरपंच गंगाधर भालेराव, युवा नेते प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..!

## जलवाहिनीच्या कामामुळे होणाऱ्या गैरसोयीबाबत नागरिकांच्या तक्रारी

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर,(केतन भोज);**घाटकोपर पश्चिम असल्फा पाईपलाईन परिसरात सध्या ६० इंच व्यासाच्या मुख्य जलवाहिनीचे नव्याने काम सुरू असून ही संपूर्ण जलवाहिनी भूमिगत स्वरूपात टाकण्यात येत आहे. मूळ जलवाहिनी अत्यंत जुनी झाली असून सध्या महापालिकेकडून नव्याने ही जलवाहिनी टाकण्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. मात्र या कामामुळे स्थानिक नागरिकांना काही समस्या उद्भवल्याने स्थानिक नगरसेवक किरण लांडगे यांच्या कडे याबाबत तक्रार करण्यात आली होती.सदरच्या सुरु असलेल्या भूमिगत जलवाहिनीच्या कामामुळे स्थानिक लोकांना पाणी कनेक्शन देण्यात आले असून येणाऱ्या पावसाळयात ते टिकण्याबाबत शंका उपस्थित केली आहे. तसेच या भागात असलेल्या मुख्य नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पावसाळयापूर्वी तो साफ करण्यात यावा अन्यथा या भागातील गटारे तुंबून मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे



भूमिगत जलवाहिनीच्या कामानंतर या ठिकाणी तयार करण्यात येणाऱ्या रोडचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात यावे जेणेकरून स्थानिकांना चिखल माती आणि खड्ड्यांचा त्रास होणार नाही.

या बाबत स्थानिक नगरसेवक किरण लांडगे यांनी आज महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्याबरोबर प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या समजावून सांगितल्या व त्यावर ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली.

## “लाडक्या बहिणींना” सरकारचा दणका? लाखो महिलांचे मार्च-एप्रिलचे हप्ते गायब!

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव :** राज्य शासनाच्या बहुचर्चित “मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण” योजनेचा मार्च-एप्रिल २०२६ चा २० वा आणि २१ वा हप्ता लाखो पात्र महिलांच्या खात्यात अद्याप जमा न झाल्याने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे काही तुरळक महिलांच्या खात्यात हप्ता जमा झाल्याचे दिसत असताना, बहुसंख्य “लाडक्या बहिणी” मात्र आर्थिक मदतीपासून वंचित राहिल्या आहेत.

शासनाने वेळोवेळी ई-केवायसी, आधार लिंकिंग, बँक खाते पडताळणी याबाबत सूचना दिल्या होत्या. महिलांनी सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही हप्ता न मिळाल्याने आता थेट शासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. “सर्व निकष पूर्ण केले, मग पैसे अडकले कुठे?” असा संतप्त सवाल लाभार्थी महिला विचारत आहेत.

दरमहा मिळणाऱ्या या रकमेतून अनेक महिला घरखर्च, औषधोपचार, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा भागवत होत्या. मात्र दोन महिन्यांचे हप्ते रखडल्याने अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली आहे. ग्रामीण भागातील महिलांना तर बँका, सीएससी केंद्रे

**ई-केवायसी पूर्ण... पात्रता कायम... तरीही खात्यात पैसे नाहीत; सरकारच्या मौनामुळे महिलांमध्ये संताप आणि संभ्रम**

आणि सरकारी कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागत असून, तरीही कुठेही ठोस उत्तर मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे शासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. तांत्रिक अडचण आहे का? निधी कमी पडला का? की लाभार्थ्यांची नव्याने पडताळणी सुरू आहे? याबाबत सरकार पूर्णपणे मौन बाळगून असल्याचा आरोप होत आहे.

“निवडणुकांच्या वेळी लाडक्या बहिणी आठवल्या, आता मात्र त्यांच्या खात्यात पैसे टाकायला सरकारकडे वेळ नाही का?” असा आक्रमक सवाल महिलांकडून उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियावरही महिलांचा रोष वाढत असून, “हप्ता द्या, उत्तर द्या” अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, रखडलेले सर्व हप्ते तात्काळ जमा करून शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा विविध महिला संघटनांनी दिला आहे.

## महागाईच्या आगीत होरपळलेल्या जनतेचा संताप उसळला; 20 मे रोजी यवतमाळात बहुजन मुक्ति पार्टीचे “चुल्हा जलाओ” आंदोलन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे :** यवतमाळ केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात बहुजन मुक्ति पार्टीतर्फे देशभरात टप्प्याटप्प्याने राष्ट्रव्यापी आंदोलन छेडण्यात आले असून, त्याअंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील “चुल्हा जलाओ” आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी दि. 12 मे 2026 रोजी बहुजन मुक्ति पार्टीच्या वतीने स्मार्ट मीटरच्या विरोधात यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर “लालटेन भेट आंदोलन” करण्यात आले होते. स्मार्ट मीटर, वाढते वीज बिल व जनतेवर होणाऱ्या आर्थिक लुटीविरोधात झालेल्या त्या आंदोलनानंतर आता पुन्हा एकदा बहुजन मुक्ति पार्टी




अधिक आक्रमक झाली असून, महागाई, बेरोजगारी, पेट्रोल-डिझेल दरवाढ, गॅस सिलेंडरचे वाढलेले दर आणि स्मार्ट मीटरच्या विरोधात “चुल्हा जलाओ” आंदोलन करण्यात येणार आहे. दि. 20 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर हे आंदोलन होणार असल्याची माहिती बिमोद मुधाने, बहुजन मुक्ति पार्टी लोकसभा अध्यक्ष, यवतमाळ-वाशीम यांच्या वतीने देण्यात आली आहे. हे आंदोलन राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे संयोजक मा. वामन मेश्राम साहेब यांच्या मार्गदर्शनात व मा. दासाराम नायक, राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन मुक्ति पार्टी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार असून, देशातील 625 जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी हे आंदोलन करण्यात येणार आहे.बहुजन मुक्ति पार्टीने आरोप केला आहे की, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सामान्य ग्राहकांची आर्थिक लूट केली जात असून, खासगी कंपन्यांना फायदा पोहोचवला जात आहे. तसेच वीज पुरवठा नसतानाही ग्राहकांवर अवाजवी वीज बिल लादले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वाढती महागाई आणि बेरोजगारीमुळे सर्वसामान्य जनता आर्थिक संकटात सापडली असून, केंद्र सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीकाही करण्यात आली आहे. आंदोलनामध्ये स्मार्ट मीटर हटवून पारदर्शक मीटर बसविणे, चुकीच्या वीज बिलाची रक्कम ग्राहकांना परत करणे, घरगुती गॅस सिलेंडर 400 रुपयांत व कमर्शियल गॅस सिलेंडर 700 रुपयांत उपलब्ध करून देणे, गॅस काळाबाजार थांबवणे तसेच हॉटेल, ढाबा व रेस्टॉरंट व्यावसायिकांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येणार आहे.

बहुजन समाज, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन बहुजन मुक्ति पार्टी यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनाला भारत मुक्ती मोर्चा, भारतीय बेरोजगार मोर्चा, भारतीय विद्यार्थी मोर्चा, राष्ट्रीय मूलनिवासी महिला संघ, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, राष्ट्रीय पिछडा वर्ग ओबीसी मोर्चा, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद यांसह अनेक सामाजिक संघटनांनी आपले समर्थन जाहीर केले आहे..

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रेयदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा

## विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

महाराष्ट्र जीत

**संजय वानखेडे अमरावती : 16 मे** मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, आमदार प्रवीण तायडे, प्रताप अडसड, संजय खोडके, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, रवी राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगर पालिका आयुक्त वर्षा लड्डा उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा, विकासकामांच्या प्रगतीचा, प्रलंबित विषयांचा तसेच आगामी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांना कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री महोदय यांनी दिलेत

बैठकीत पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, कृषी, लघु सिंचन, ग्रामपंचायत, बांधकाम तसेच सामान्य प्रशासन विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करावे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.उमेद अभियान अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बचत गटांना बळकटी देण्यासाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचे फिरते भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल. स्वच्छ भारत मिशन मध्ये पाच हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या



असलेल्या गावांसह आसपासच्या गावांचा क्लस्टर तयार करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभा करावा आणी प्रकल्पांतर्गत सेंद्रिय खत निर्मिती करून ते स्थानिक शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्यात.

कृषी विभागाने भरारी पथक स्थापन करून कार्यान्वित करावे, महिला व बालविकास विभागाला पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून नागपूर मॉडेलच्या धर्तीवर अंगणवाडी केंद्रांचे उन्नतीकरण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

लघु सिंचन विभागाने जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत. पाणीस्रोतांचे सर्वेक्षण करून मृत बंधारे पुनर्जीवित करावे, गॅबियन बंधारे तयार करावे आणी सि एस आर निधी उपलब्ध करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एकत्रित नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तर ग्रामपंचायत विभागाला टप्प्याटप्प्याने स्मशानभूमी विकासाची कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आले.

सामान्य प्रशासन विभागाच्या आढाव्यात जिल्ह्यातील गट विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे पालकमंत्री महोदय म्हणालेत. आरोग्य विभागाला नागपूर मॉडेलप्रमाणे "मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र" विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व विभागांच्या समन्वयातून जिल्ह्यात २५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या.

शिक्षण विभागाने पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून जास्त पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये डिजिटल शाळा विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दूरवरून शाळेत येणाऱ्या पाच हजार विद्यार्थ्यांना सायकल उपलब्ध करून देण्याचाही निर्णय यावेळी घेण्यात आला.

पाणीपुरवठा विभागाला जुन्या




योजनांची दुरुस्ती, रिचार्ज शाफ्ट उभारणी करण्याचे सूचित करून पाणीटंचाई निधी तातडीने वितरित केला जाईल असेही सांगण्यात आले. वाचन संस्कृतीला बाळकट करण्यासाठी जिल्ह्यातील १०० गावात "मॉडेल वाचनालये" तयार करण्यात येणार असून त्यासाठी वापरात नसलेल्या शासकीय इमारतींचा उपयोग करावा असे निर्देश मा. मंत्री महोदय यांनी दिलेत. एल निनो च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणात राबविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. प्रत्येक गावात नाला खोलीकरण, शेततळे आणि इतर उपाययोजना हाती घेण्यावर भर देण्यात आला. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सिंचन, घरकुल दिवाबत्ती आणि सौर ऊर्जा या विषयांना प्राधान्य देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी बैठकीत दिले. याशिवाय, यावर्षी कोणत्याही निधीतून अनावश्यक सिमेंट रस्त्यांची कामे करू नयेत आणि गावांतील पथदिवे सौर ऊर्जेवर रूपांतरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

---

# स्वराज्याच्या सिंहाला लाभलेली प्रेमळ सावली म्हणजे महाराणी सईबाई निंबाळकर — बबनराव निर्मळ

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे पाचोड, दि. १८ :** पुणे येथील ऐतिहासिक लाल महाल येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि फलटणच्या निंबाळकर घराण्यातील माधोजीराव नाईक निंबाळकर यांच्या कन्या महाराणी सईबाई निंबाळकर यांचा विवाह १६ मे १६४० रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त येथील शिवछत्रपती महाविद्यालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पाचोड येथील ज्येष्ठ नागरिक बबनराव निर्मळ




उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रशेन कोठावळे होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी सईबाई निंबाळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक बबनराव निर्मळ यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

मार्गदर्शन करताना बबनराव निर्मळ म्हणाले की, "१७ व्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी सईबाई निंबाळकर यांचा विवाह हा केवळ दोन जीवांचा मिलाप नव्हता, तर हिंदवी स्वराज्याच्या भविष्यातील निर्मितीची एक महत्त्वपूर्ण राजकीय व सामाजिक पायाभरणी होती. महाराणी सईबाई निंबाळकर म्हणजे स्वराज्याच्या सिंहाला लाभलेली प्रेमळ सावली होती."

यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. चंद्रशेन कोठावळे म्हणाले की, "राजकारण, संघर्ष आणि स्वराज्याच्या ध्येयामध्येही सईबाई राणीसाहेब या छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी शांततेचा आधार बनून राहिल्या. शिवछत्रपतींना मिळालेल्या यशाचे श्रेय जिजामातेच्या शिकवणीइतकेच सईबाई राणीसाहेबांच्या समर्पण व त्यागालाही जाते. जिजाऊ माँसाहेबांसोबत स्वराज्याचे कर्तव्य समर्थपणे पार पाडण्यात सईबाईंचे योगदान मोठे होते."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री वैभव राऊत यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीकांत चिंचखेडे यांनी मानले. यावेळी सुखदेव पोटफोडे, त्र्यंबक वाघमारे, मुरलीधर झिणे, मनोज राक्षे आदी उपस्थित होते.

---

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पात्र उमेदवारांना प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्याचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ परीक्षेत पात्र उमेदवारांना १८ मे ८ जून २०२६ या कालावधीत प्रमाणपत्राचे वाटप केले जाणार आहे. तरी पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह आपण परीक्षा दिलेल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांच्या कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून आपले प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे, असे आवाहन परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

महाटीईटी- २०२५ परीक्षेचे आयोजन २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या परीक्षेतील पेपर क्र. १ (इ. १ ली ते इ. ५ वी स्तर) व पेपर क्र. २ (इ. ६ वी ते इ. ८ वी स्तर) चा अंतिम निकाल ३ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आलेला होता.

महाटीईटी परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र त्या त्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांच्या कार्यालयाकडे देण्यात येत आहेत. पात्रता धारक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी परीक्षा परिषदेच्या http://www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

---

# शेर अभी जिंदा हैं! नामदार रामदासजी आठवले साहेबांचे देवळालीकरांच्या वतीने जल्लोषात स्वागत

## देवळाली कॅम्प शहर हे आठवले साहेबांचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा सिद्ध

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनानिमित्त रिपाईच्या वतीने नामदार रामदासजी आठवले साहेबांची जाहीर सभा व बुद्ध भिमगीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर जाहीर सभेस आलेल्या नामदार रामदासजी आठवले साहेबांचे आंबेडकरी जनतेने प्रचंड उपस्थितीत उत्सहात स्वागत केले...

प्रारंभी रिपाईच्या नगरसेविका दिक्षाताई लोंढे, बि वाय, पगारे व उषाताई आडके यांच्या हस्ते चित्ररथांना पारितोषिक देण्यात आले..

व्यासपीठावर रामदासजी आठवले साहेब आणि सौ. सिमाताई आठवले यांच्या मंगल परिणय दिनाच्या पूर्व सांधेला सरचिटणीस महेंद्र सोनवणे यांच्या वतीने आठवले साहेब आणि सिमाताई आठवले यांचे छायाचित्र असलेला भव्य केक साहेबांच्या हस्ते कापण्यात




आला.

जेष्ठ पत्रकार सुधाकरजी गोडसे यांचा वाढदिवस असल्या कारणाने साहेबांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.मुस्लिम समाजाचे प्रसिद्ध व्यापारी कलीमभाई पठाण यांनी साहेबांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.कार्यक्रमास जास्त उशीर झाल्याकरणाने कोर्टाच्या आदेशाचे पालन करत नामदार रामदासजी आठवले साहेबांनी भाषण करणे टाळत पुढील कार्यक्रमास रवाना झाले. झियुवा सिंगर चेतन लोखंडे यांच्या बहारदार गितांनी उपस्थित्यांची मनं जिंकली..

साहेबांच्या सोबत रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते काकासाहेब खंबाळकर व श्रीकांतजी भालेराव, संजय नाना भालेराव युवक जिल्हाप्रमुख अमोलजी पगारे,रामबाबा पठारे, चंद्रकांतभाई भालेराव समीरभाई शेख, संतोषजी पाटील कलीमभाई सय्यद, प्रमोदजी बागुल,सागर गायकवाड,दिलीप साळवे, भाऊसाहेब जगताप सुशांत भालेराव. आकाशजी घुसळे आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व संयोजक आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ नेते मा. सिद्धार्थजी पगारे, गौतमजी पगारे, आर. डी. जाधव.अशोकजी साळवे, गौतम भालेराव, राहुलजी काळे,शामदास आडके, आदिवासी आघाडीचे शहराध्यक्ष प्रकाशजी किरवे. शहराध्यक्ष पंडितजी साळवे, सरचिटणीस महेंद्र सोनवणे, उपाध्यक्ष रवींद्रजी गांगुर्डे , शहर नेते पद्माकर दोंदे, संतोष गायकवाड,कुंदन दोंदे,रिक्षा युनियन अध्यक्ष सुनिलनाना पगारे.जिल्हानेते अंबादास गवारे,उपाध्यक्ष विजय निकम. संतोष भडांगे,शहर नेते राजाभाऊ वाघमारे, संघटक शिवराज मोरे.

शहर नेते प्राणिल शेजवळ. योगेश लोखंडे, शुभम पगारे. अक्षय आडके, तेजस साळवे,प्रतीक पगारे,मयूर भालेराव,महेंद्र पगारे, रवींद्र बोराडे. पंकज शेजवळ, शरद गायकवाड, विकी वाघमारे यांच्यासह जयंती अध्यक्ष यश साळवे, कार्याध्यक्ष पत्रकार गोकुळजी लोखंडे,प्रितम भालेराव , शैलेश बोराडे, प्रथमेश पगारे, अजिंक्य जाधव आदिसह भिमसैनिक व तमाम आंबेडकरी जनता उपस्थित होते.

---

# माळ राजुरा येथील आरोग्य सेविका अनिता चोरमारे यांना फ्लोरेन्स नाईटीनगल आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** सारकिन्ही ,पातुर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र माळराजुरा येथील आरोग्य सेविका यांनी आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा फ्लोरेस नाईटीनगल आरोग्य रत्न पुरस्काराने महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला र.नं. 38 81 यांच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



जागतिक परिचर्या दिनाचे औचित्य साधून अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागात ग्रामीण भागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका , स्वास्थ अभ्यंगता, विस्तार अधिकारी, यांचा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन दि. 17 मे 2026 रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये अनिताताई चोरमारे यांना पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजपत्रित अधिकारी महासंघ राज्य अध्यक्ष बाळासाहेब घुगे, महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संगीता जाधव, आरोग्य कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष पांडुरंग तेलगोटे, संघटनेचे सचिव संजय डाबेराव, मंचकावर उपस्थित होते, यावेळी अकोला जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि उपकेंद्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका, स्वास्थ अभ्यंगता, यांना सन्मानचिन्ह देऊन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, फ्लोरेन्स नाईटीनगल आरोग्य रत्न पुरस्काराने आरोग्य सेविका अनिता चोरमारे ह्यांना सन्मानित करण्यात आले

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र माळराजुरा येथे अनिता चोरमारे आरोग्यसेविका गेल्या कित्येक वर्षापासून जोखमीच्या डोंगराळ भागात जोखमीच्या माता जोखमीचे बालक अर्भक मृत्युदर बालमृत्युदर उबजत मृत्यूदर माता मृत्यू दर कमी करण्यासाठी आरोग्य विभागात अहोरात्र आरोग्य सेवा देत आहे व डोंगराळ भागात जसे की गोंधळवाडी चिचखेड कोसगाव माळराजुरा धोधाणी आणि बोडखा अशा डोंगराळ भागातील गावांमध्ये शेवटच्या अतिजोखमीच्या घटकांपर्यंत निस्वार्थ इमानदारीने पोहोचून आरोग्यसेवा देत आहेत तसेच यांच्या केलेल्या निस्वार्थ आरोग्य सेवेची दखल महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना यांनी घेत यांना आरोग्य विभागातील सर्वउत्कृष्ट उच्च दर्जाचा जागतिक परिचारिका दिनानिमित्त फ्लोरेन्सनाईटिंगल आरोग् रत्न पुरस्कार प्रदान केला माता व बालक यांच्या संगोपनाकरिता अहोरात्र झगडत डोंगराळ भागात काम करीत आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्कारामुळे आरोग्य विभागातील त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# सिमेंटच्या छाताडावर पिंपळाची जिद्द: आपल्या 'सोयीस्कर' जगण्याला निसर्गाचा आरसा !

त्या दिवशी दुपारचं ऊन अंगाची लाहीलाही करत होतं. सगळीकडे सिमेंटचं जंगल, वाहनांचा धूर आणि कोलाहल... 'ग्लोबल वॉर्मिंग' आता फक्त पुस्तकातला शब्द राहिला नव्हता, तर तो माझ्या तळव्यांना चटका देणाऱ्या जमिनीतून प्रत्यक्ष जाणवत होता. मी एका जुन्या वस्तीच्या कोपऱ्यात उभा राहिलो आणि अचानक माझे डोळे एका विलक्षण दृश्यावर खिळले. तिथल्या एका पडक्या, कठीण सिमेंटच्या भिंतीला विळखा घालून एक पिंपळाचं झाड ताठ मानेने उभं होतं. त्याच्या पायापाशी शहराचा नको असलेला प्लास्टिकचा कचरा साचला होता, पण त्याची हिरवीगार पानं मात्र आकाशाकडे झेपावत होती.

मी, विजयकुमार कट्टी, आज तुमच्यासमोर निसर्गाचा एक अदृश्य विद्यार्थी म्हणून हा अनुभव मांडत आहे. हे झाड माझ्या डोळ्यासमोर केवळ वाढत नाहीये, तर ते माझ्याशी संवाद साधत आहे, मला आणि आपल्या संपूर्ण मानवी संस्कृतीला एक क्रूर आरसा दाखवत आहे.

**'सोय' आणि 'आराम': माणुसकी आणि निसर्गाचे मारेकरी**

या पिंपळाची मुळं आणि आपली आजची आधुनिक जीवनशैली यांच्यात एक मोठी आणि भयानक विसंगती आहे. आपण आज अशा युगात जगत आहोत जिथे एका बटणावर हव्या त्या गोष्टी दारासमोर येतात. या 'इन्स्टंट' संस्कृतीने आपल्यातील 'चिकाटी' आणि 'संयम' पूर्णपणे संपवला आहे. या झाडाला बघा, याला पाण्याचा एक छोटा थेंब मिळवण्यासाठी सुद्धा सिमेंटच्या कठीण थरांशी वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला.

पण आपण? आपल्याला थोडा जरी उन्हाचा चटका लागला की आपण लगेच एसीच्या (AC) थंड हवेत आश्रय घेतो. आपली ही 'कम्फर्ट झोन' (Comfort Zone) शोधण्याची सवयच आज जागतिक तापमान वाढीचं (Global Warming) सर्वात मोठं कारण बनली आहे. आपण निसर्गाला आपल्या सोयीनुसार वाकवण्याचा अट्टहास केला, आणि आज निसर्ग आपल्याला त्याचे चटके परत करत आहे.

खंत एकाच गोष्टीची वाटते, की जसजसे आपण अधिक 'सोयीस्कर' आयुष्य जगू लागलो, तसतसे आपण अधिक 'असंवेदनशील' होत गेलो. पूर्वी विहिरीवर पाणी भरताना किंवा झाडाच्या सावलीत विसावताना माणसांची मनं एकमेकांशी जोडली जायची, तिथे माणुसकीचा ओलावा होता. आज आपल्याकडे पाणी थेट नळाला येतं, डोक्यावर सिमेंटची छतं आहेत, पण शेजारी कोण राहतो आणि त्याच्या आयुष्यात काय दुःख आहे, याच्याशी आपल्याला देणंघेणं उरलेलं नाही. आपण स्वतःला आपल्या सुबक घरांच्या चौकटीत इतकं बंदिस्त केलं आहे की, बाहेरच्या जगात झाडं तोडली जात आहेत की नद्या प्रदूषित होत आहेत, याचं आपल्याला काहीच वाटेनासं झालंय.

"आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पाहायचं वाकून" ही आपली प्रवृत्ती झाली आहे; आपण स्वतःच्या सोयी जपतोय आणि निसर्गाचा ऱ्हास होताना डोळे झाकून घेत आहोत.

**परमोच्च बिंदू (The Climax): जेव्हा मुळांनी भिंतीला कवेत घेतले!**

या कथेचा परमोच्च बिंदू त्या क्षणी येतो, जेव्हा मला या झाडाचा खरा संघर्ष समजतो. या झाडाने सिमेंटच्या भिंतीला शत्रू मानून तिचा द्वेष केला नाही, तर तिलाच आपला आधार बनवून टाकले! ज्या भिंतीने त्याला रोखले होते, तिलाच त्याने आपल्या कवेत घेतले. जणू काही ते झाड जगाला सांगत होते की, "बळी तो कान पिळी" ही म्हण केवळ




शारीरिक शक्तीसाठी नाही, तर मानसिक जिद्दीसाठीही लागू होते.

हाच तो क्षण होता जिथे मला जागतिक तापमान वाढीवरचं आणि हवामान बदलावरचं (Climate Change) खरं उत्तर सापडलं. आपण आज शहरांना नष्ट करू शकत नाही, पण या सिमेंटच्या शहरांनाच आपण 'हरित कवच' (Green Cover) नक्कीच बनवू शकतो. आपण माती नसल्याचे रडत बसलो, तर हे झाड कधीच मोठे झाले नसते. त्याने उपलब्ध परिस्थितीतून मार्ग काढला. आपणही आपल्या गच्चीवरील उद्यान असो वा टाकाऊ वस्तूंपासून केलेले पर्यावरणपूरक उपक्रम, यातून बदल घडवायला हवा. म्हणतात ना, "थेंबे थेंबे तळे साचे"—आपल्या छोट्या कृतीच जागतिक बदलाचा पाया रचतील.

**इन्फरन्स (Inference): संकट हीच नवीन संधी!**

मी जेव्हा या झाडाच्या खोडावर हात ठेवला, तेव्हा मला जाणवलं की त्याचं हृदयही माझ्यासारखं धडधडतंय. त्यालाही जगण्याची इच्छा आहे. आपण या पृथ्वीवर मालक म्हणून नाही, तर या झाडाचे 'सहप्रवासी' म्हणून आलो आहोत. या झाडाच्या मुळांमधून मला एक 'इन्फरन्स' (निष्कर्ष) मिळाला—संकट हे नेहमीच संधी घेऊन येते. आज जे तापमान वाढीचे संकट आहे, तीच आपल्याला नवी जीवनशैली स्वीकारण्याची आणि 'चक्राकार अर्थव्यवस्था' (Circular Economy) राबवण्याची मोठी संधी आहे.

"आंधळा दळतो आणि कुत्रं पीठ खातं" अशी आपली आजची अवस्था झाली आहे. आपण विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडतोय आणि त्याचे गंभीर परिणाम आपली पुढची पिढी भोगत आहे. पण हा पिंपळ मात्र या कचऱ्यात असूनही प्राणवायू देण्याचं आपलं कर्तव्य विसरत नाही. तो एका 'क्षमा' मूर्तीसारखा शांत उभा आहे.

**एक आवाहन... एक आत्मशोध!**

"अती तिथे माती" होण्याआधी, आपण निसर्गाच्या या शाळेत प्रवेश घ्यायला हवा. हा पिंपळ आज केवळ एक वनस्पती राहिलेली नाही, तर तो माझ्या 'आत्मशोधाचा' प्रवास बनला आहे. तो वारा आला की आपली पानं हलवून मला आणि तुम्हाला रोज एकच प्रश्न विचारतोय—"मी या कठीण सिमेंटलाही जीवनदान देऊ शकलो, तुम्ही तर सजीव आहात, तुम्ही माणसांना आणि निसर्गाला पुन्हा कधी जोडणार?"तुमच्या एसीच्या खोलीत तुम्हाला जे भौतिक सुख मिळतंय, ते या झाडाच्या सावलीत मिळणाऱ्या आत्मिक समाधानापेक्षा मोठं असूच शकत नाही. चला, आपल्या 'सोयीच्या' चौकटी तोडून बाहेर येऊया आणि या पृथ्वीला पुन्हा एकदा सुजलाम् सुफलाम् करूया!तुम्ही कधी स्वतःच्या अंतर्मनात झाकून पाहिलंय का, की तुमच्या 'सोयींनी' तुम्हाला तुमच्या स्वतःच्या माणुसकीपासून आणि निसर्गापासून किती दूर नेलं आहे?

महाराष्ट्र जीत

**लेखक**
**विजयकुमार कट्टी**

# हंटा व्हायरसची भीती कशाला?

महाराष्ट्र जीत


हंटा व्हायरस हा विषाणूंचा एक वंश आहे, जो मानवांमध्ये रोग निर्माण करू शकतो. हे विषाणू संक्रमित उंदरांच्या उत्सर्जनातून तयार होणाऱ्या सूक्ष्म कणांच्या श्वसनाद्वारे पसरतात आणि रक्तस्रावजन्य तसेच फुफ्फुसांशी संबंधित विविध लक्षणे निर्माण करतात. एप्रिल २०२६ मध्ये, डच क्रूझ जहाज एमव्ही हौंडीजवर अँडीज व्हायरसमुळे झालेल्या हंटा व्हायरस संसर्गाचा उद्रेक ओळखण्यात आला आणि जगाचे लक्ष पुन्हा या विषाणूकडे गेले.

जगाला हंटा व्हायरसचा इतिहास १९५०च्या कोरियन युद्धादरम्यान ओळखल्या गेलेल्या साथीच्या उद्रेकांपासून माहीत झाला. १९७८ मध्ये कोरियन हेमोरॅजिक फिव्हरला कारणीभूत विषाणू दक्षिण कोरियातील हंटा न नदीजवळ आढळलेल्या ॲपोडिमस ॲग्रारियस या संक्रमित लहान शेतउंदरामधून वेगळा करण्यात आला. त्या नदीच्या नावावरून या विषाणूला हंटा म्हणजेच हंटा न व्हायरस असे नाव देण्यात आले. या विषाणूचा शोध कोरियन युद्धानंतर (१९५१-१९५३) सुरू झालेल्या वैज्ञानिक संशोधनांमधून लागला. कारण, त्या काळात संयुक्त राष्ट्राच्या सैन्यात कोरियन हेमोरॅजिक फिव्हरची ३००० हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली होती.

पुढे जाऊन १९९३ मध्ये अमेरिकेतील युटा, कोलोरॅडो, ॲरिझोना आणि न्यू मेक्सिको यांच्या सीमेवरील नेटिव्ह अमेरिकन प्रदेशात एका गूढ साथीच्या रोगाच्या उद्रेकामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. न्यू मेक्सिको राज्यामधील एका तरुण दाम्पत्याच्या रहस्यमय मृत्यूनंतर तेथील आरोग्य कर्मचाऱ्यांना त्याचे कारण ओळखण्यात अडचणी आल्या. त्याचदरम्यान त्यांना या प्रदेशातील आणखी डझनभर रुग्णांमध्ये समान लक्षणे आढळल्याचे लक्षात आले. नंतर असे आढळून आले की, हंटा व्हायरसची एक नवीन प्रजाती उदयास आली होती. तिला सिन नोम्ब्रे व्हायरस (स्पॅनिश भाषेत नाव नसलेला) असे नाव देण्यात आले आणि यामुळे अखेरीस १३ लोकांचा मृत्यू झाला. हा उद्रेक आता १९९३ फोर कॉर्नर्स उद्रेक म्हणून ओळखला जातो आणि आणि तिथूनच हंटा व्हायरसच्या उत्क्रांतीबद्दल जागतिक तज्ज्ञांना चिंता वाढली.

हंटा व्हायरस हा विषाणूंचा एक वंश आहे, जो मानवांमध्ये रोग निर्माण करू शकतो. हे विषाणू संक्रमित उंदरांच्या उत्सर्जनातून तयार होणाऱ्या सूक्ष्म कणांच्या श्वसनाद्वारे पसरतात आणि रक्तस्रावजन्य तसेच फुफ्फुसांशी संबंधित विविध लक्षणे निर्माण करतात. हंटा न ऑर्थोहंटा व्हायरस आणि डोब्रावा-बेलग्रेड ऑर्थो हंटा व्हायरस यांसारख्या काही प्रजाती जगातील विविध भागांत अनेक शतकांपासून अस्तित्वात असण्याची शक्यता आहे, तर सिन नोम्ब्रे व्हायरस आणि अँडीज व्हायरस या प्रजाती १९९०च्या दशकात वेगळ्या ओळखल्या गेल्या. १९९६ मध्ये, पहिल्यांदाच अर्जेंटिनामध्ये झालेल्या उद्रेकाने व्यक्तीकडून व्यक्तीकडे होणाऱ्या संक्रमणाची पहिली घटना नोंदवली. जुन्या आणि नव्या जगातील विषाणूंमधील हा फरक आजारपण, मृत्यूदर आणि महामारी बनण्याच्या शक्यतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. हंटा व्हायरसचा मानवाकडून मानवाकडे प्रसार फारच दुर्मीळ असला, तरीही साथीचे उद्रेक सार्वजनिक आरोग्यासाठी चिंतेचा विषय राहतात. विशेषतः घरगुती संसर्ग आणि रुग्णालयांमधील प्रसाराच्या धोक्यामुळे, जिथे संक्रमण रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये पसरते.

एप्रिल २०२६ मध्ये डच क्रूझ जहाज एमव्ही हौंडीजवर अँडीज



व्हायरसमुळे झालेल्या हंटा व्हायरस संसर्गाचा उद्रेक ओळखण्यात आला आणि जगाचे लक्ष पुन्हा या विषाणूकडे गेले. १३ मेपर्यंत या उद्रेकाशी थेट संबंधित आठ प्रकरणे, एक निष्कर्ष न लागलेले प्रकरण आणि दोन संशयित प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हे जहाज १ एप्रिल रोजी अर्जेंटिनातील उशुआया येथून निघाले होते. ११ एप्रिल रोजी एका प्रवाशाचा या विषाणूमुळे जहाजावर मृत्यू झाला. त्याचा मृतदेह २४ एप्रिल रोजी सेंट हेलेना येथे किनाऱ्यावर नेण्यात आला. तिथे ३० प्रवासी उतरले होते. त्यामध्ये त्यांची पत्नीही होती, जिचा दोन दिवसांनी जोहान्सबर्गमधील रुग्णालयात मृत्यू झाला. जहाजावर आणखी दोन प्रवाशांचा अनुक्रमे २६ आणि २८ एप्रिल रोजी मृत्यू झाला. एका ब्रिटिश प्रवाशाला २ मे रोजी गंभीर पण स्थिर अवस्थेत उपचारासाठी जोहान्सबर्ग येथे पाठविण्यात आले. जागतिक आरोग्य अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, यावर्षी अर्जेंटिनामध्ये हंटा व्हायरसची १०० हून अधिक प्रकरणे आणि ३० पेक्षा जास्त मृत्यू नोंदवले गेले आहेत.

न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसीनमध्ये २०२० मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनांनुसार, ज्यांच्या शरीरात विषाणूचे प्रमाण जास्त होते, अशा रुग्णांकडून इतर लोकांमध्ये विषाणू पसरण्याची शक्यता अधिक होती. तसेच, मोठ्या सामाजिक कार्यक्रमांमध्ये किंवा संक्रमित व्यक्तीशी दीर्घकाळ आणि जवळचा संपर्क आल्यास संक्रमण होण्याची शक्यता जास्त असल्याचे आढळले.

१९९३ ते २०२३ पर्यंत या विषाणूची काही प्रकरणे जगभरात वाढली होती.

अमेरिका : अंदाजे ८९० एकूण प्रकरणे. हा अत्यंत दुर्मीळ आजार असून देशभरात दरवर्षी सुमारे २०-३० प्रकरणे नोंदवली जातात.

कॅनडा : अंदाजे १५० एकूण प्रकरणे. मुख्यतः पश्चिमेकडील प्रांतांमध्ये आढळतात.

दक्षिण अमेरिका : दरवर्षी २००-३००प्रकरणे. ब्राझील आणि अर्जेंटिना यांसारख्या प्रदेशांमध्ये हा आजार स्थानिक आहे. येथे मृत्यूदर तुलनेने जास्त असतो.

चीन आणि पूर्व आशिया : दरवर्षी १००००० हून अधिक प्रकरणे. जगातील सर्वाधिक भार या प्रदेशावर आहे आणि जागतिक संसर्गांचा बहुतांश भाग येथे आढळतो.

युरोप : दरवर्षी दोन ते चार हजार प्रकरणे आढळतात. मध्य आणि उत्तर युरोपमध्ये लहान उद्रेकांचे समूह दिसतात, जे उंदरांच्या लोकसंख्येच्या चक्रांनुसार बदलतात.

दक्षिण-पूर्व आशिया आणि भारत : अधूनमधून आढळणारी प्रकरणे. उंदरांच्या लोकसंख्येमध्ये विषाणू उपस्थित असला, तरी मानवांमध्ये नोंदवलेली प्रकरणे पूर्व आशियाच्या तुलनेत फारच कमी आहेत.

या विषाणूमुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे इतर विषाणूजन्य आजारांसारखीच असतात: ताप, कोरडा खोकला, अंगदुखी, डोकेदुखी आणि अतिसार. संसर्ग पुढे वाढला, तर श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो आणि फुफ्फुसांमध्ये द्रव साचू शकतो.या विषाणूमुळे होणाऱ्या संसर्गाचे निदान करणे कठीण ठरते. कारण, त्यासाठी विशिष्ट अशी चाचणी उपलब्ध नाही. त्यामुळे डॉक्टर सामान्यतः रुग्णाचा उंदरांशी संपर्काचा इतिहास, त्यासोबत ताप आणि थकवा यांसारखी लक्षणे यांचा आधार घेऊन निदान करतात. लक्षणांची इतर आजारांशी साधर्म्यता आणि विशिष्ट चाचणीचा अभाव यामुळे हा आजार ओळखणे अवघड होते. तसेच, तो एखादा रुग्ण अशी काही लक्षणे घेऊन आला, तर डॉक्टरांच्या मनात सर्वप्रथम येणाऱ्या शक्यतांपैकी नसतो. बहुतेक सौम्य आजाराची प्रकरणे आणि ज्यांची रोगप्रतिकार शक्ती चांगली आहे, असे रुग्ण स्वतःहून बरे होऊ शकतात; परंतु सामान्यतः सहायक उपचार आवश्यक असतात आणि ते रुग्णाच्या बरे होण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. उदाहरणार्थ, एखाद्या रुग्णाच्या फुफ्फुसांमध्ये द्रव साचू लागला, तर त्याला श्वसनयंत्राची मदत लागू शकते किंवा अतिदक्षता विभागात ठेवून सहायक उपचार दिले जाऊ शकतात. सध्या या आजारासाठी कोणताही ठरावीक विशिष्ट उपचार प्रोटोकॉल निश्चित करण्यात आले नाहीत; पण यावर जागतिक आरोग्य संघटनेकडून तातडीचे प्रयत्न चालू आहेत.

हा विषाणू सर्वाधिक वेळा हवेमार्फत पसरतो. त्यामुळे संसर्ग रोखताना ही गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एखादी व्यक्ती उंदरांच्या विष्ठा असलेल्या भागात असेल, तर तो भाग ओला करणे ज्यामुळे हवेत उडणारे सूक्ष्म कण कमी होतात. विशेषतः जेव्हा साफसफाईदरम्यान विषाणू जास्त पसरण्याची शक्यता जास्त असते. हे काम घरगुती निर्जंतुकीकरण द्रव्ये, ब्लीच किंवा अल्कोहोल वापरून करता येते. तसेच त्या भागात हवा खेळती ठेवणेही महत्त्वाचे आहे. खिडक्या आणि दरवाजे उघडून ताजी हवा फिरू देणे उपयुक्त ठरते. हंटा व्हायरस हा अनेक विषाणूंमध्ये एक आहे, जो प्राण्यांच्या मलमूत्र असलेल्या भागांमध्ये आढळू शकतो. म्हणूनच जिथे जंगली प्राण्यांची विष्ठा किंवा मृत प्राणी हाताळावे लागतात, अशा ठिकाणी अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. अशा भागांची साफसफाई करताना व्यवस्थित बसणारा एन ९५ मास्क वापरणे आवश्यक आहे; जेणेकरून विषाणू वाहून नेणारे सूक्ष्म कण फुफ्फुसांपर्यंत पोहोचू नयेत.

हंटा व्हायरस संसर्गाचा मृत्यूदर आशिया आणि युरोपमध्ये साधारणपणे एक ते दीड टक्का इतका असून, अमेरिकेत तो 50 टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांना वाटते. हंटा व्हायरससाठी सध्या कोणतेही उपचार किंवा लस उपलब्ध नाही; मात्र लवकर दिली जाणारी सहायक काळजी आणि संपूर्ण आयसीयू सुविधा असलेल्या रुग्णालयात त्वरित उपचारासाठी हलवणे यामुळे रुग्ण बरा होण्याची शक्यता अधिक असते. पर्यावरणीय आणि पर्यावरणशास्त्रीय घटक उंदरांच्या लोकसंख्येवर परिणाम करत असल्यामुळे या रोगाचे हंगामी स्वरूप बदलू शकते. कारण, हंटा व्हायरसचे नैसर्गिक साठे आणि उगमस्थान वन्य उंदीर असल्यामुळे त्यांच्या अधिवासाशी संपर्क येतो तेव्हाच लोकांना संसर्ग होऊ शकतो.सध्यातरी यावर कोणतेही अधिकृत उपचार नसल्यामुळे सार्वजनिक आरोग्य जागरूकता मोहिमा, लवकर निदान, वेळेवर उपचार सुनिश्चित करण्यावर आणि संसर्गाच्या संपर्काचा धोका कमी करण्यावर केंद्रित असाव्यात असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

प्रतिबंधात्मक उपायांमध्ये कामाशी संबंधित तसेच इकोटुरिझमशी संबंधित जोखमींचा विचार केला पाहिजे. संक्रमण प्रतिबंध आणि नियंत्रण उपायांवर भर देणे तसेच उंदरांवर नियंत्रण ठेवण्याच्या रणनीतींचा समावेश करणे आवश्यक आहे.

**डॉ. नानासाहेब थोरात**